सर्व सुक्ष्म, लघु, मध्यम,. मोठ्या व विशाल औद्योगिक उपक्रमांमध्ये किमान ८० % स्थानिक उमेदवारांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्याने घेण्याबाबत-

**महाराष्ट्र शासन**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र.-स्थालोरो-२००८/प्र.क्र.१३/उद्योग-६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १७ नोव्हेंबर, २००८.

वाचा:- (१) शासन परिपत्रक, उद्योग व कामगार विभाग, क्र. ईएमपी-४४६८/३९१२-कामगार-१, दि. ०५.११.१९६८.
(२) शासन निर्णय , उद्योग व कामगार विभाग, क्र. ईएमपी-४४७०/१४३७२७-कामगार-१, दि. २५.०८.१९७०.
(३) शासन निर्णय, उद्योग व कामगार विभाग, क्र. आयएसटी-१०७२/१३४९१/उद्योग-३, दि. १३.०२.१९७३.
(४) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. आयडीएल-१००५/प्र. क्र. ११९/उ.-८, दि. ०२.०६.२००५.
(५) शासन निर्णय , उद्योग व कामगार विभाग, क्र. पीएसआय-१७०७/प्र.क्र.५०/उद्योग-८, दि. ३०.०३.२००७.

__प्रस्तावना__- औद्योगिक विकासातून राज्यातील स्थानिक लोकांना जास्तीत जास्त रोजगार मिळावा या दृष्टीकोनातून स्थानिक लोकांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्याचे धोरण शासनाने अवलंबिलेले आहे. त्यानुसार सर्व उद्योग घटकांनी लोकांना पर्यवेक्षकीय श्रेणीत किमान ५० % व पर्यवेक्षकीयसहीत इतर श्रेणीत किमान ८० % कर्मचारी नियुक्त करावे, तसेच नोकर भरती करणारा अधिकारी मराठी जाणणारा असावा असे अपेक्षित आहे. राज्य शासनाने सदर धोरणात्मक निर्णय घेताना भारतीय राज्य घटनेत भारतीय नागरीकांस देशात कुठेही वावरण्याचा तसेच रोजगार मिळविण्याचा हक्क असल्याची तरतूद लक्षात घेवून उद्योग घटकांना त्यांच्या आस्थापनेमध्ये जास्तीत जास्त स्थानिक लोकांना रोजगार देण्याबाबत सातत्याने प्रोत्साहीत केले आहे. त्यामुळे सर्वसाधारणपणे किमान ८० % स्थानिक लोकांना नोकऱ्यांमध्ये घेण्यात आल्याचे दिसून येते. सदर धोरणाची अधिक परिणामकारकपणे सनियंत्रण करण्याची व जास्तीत जास्त स्थानिक लोकांना रोजगार मिळवून देण्याबाबत उपाय योजना ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या संदर्भात शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

__शासन निर्णय__:- औद्योगिक विकासाच्या लाभामध्ये स्थानिक जनतेला योग्य वाटा मिळावा या उद्देशाने राज्यातील सर्व औद्योगिक घटकांमध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत किमान ५० % व पर्यवेक्षकीयसहीत इतर श्रेणीत किमान ८० % स्थानिक उमेदवारांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्याने घेण्याबाबत, तसेच नोकर भरती करणारा अधिकारी मराठी जाणणारा असावा या शासनाच्या विद्यमान धोरणाची अंमलबजावणी खाली नमुद केलेल्या कार्यपध्दतीनुसार करण्यात यावी :-

(अ) ज्या सुक्ष्म, लघु, मध्यम, मोठ्या व विशाल नोंदणीकृत औद्योगिक घटकांनी विविध प्रोत्साहने व सवलतींचा लाभ घेतलेला आहे अशा सर्व उपक्रमांनी खालील बाबींची पूर्तता करावी :-

(१) उपरोक्त प्रत्येक औद्योगिक घटकाने विहीत प्रपत्रात (स्थालोरो -२) सामुहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत पात्रता प्रमाणपत्रासाठीच्या अर्जासोबत संबंधित अभिकरण संस्थेकडे लेखी हमीपत्र सादर करावे.

(२) उपरोक्त प्रत्येक औद्योगिक घटकाने उत्पादन सुरु केल्यानंतर व तद्नंतर वार्षिक नियत कालीक अहवाल विहीत प्रपत्रात (स्थालोरो- १) संबंधित जिल्हा उद्योग केंद्र/उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग यांचेकडे त्या त्या आर्थिक वर्षानंतरच्या पुढील ३० जून या तारखेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील.

(३) उपरोक्त औद्योगिक घटकांनी कर्मचारी स्थानिक असल्याचा पुरावा जसे राज्यातील अधिवास प्रमाणपत्र किंवा जातीचे प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचा दाखला या सारखे प्रस्तुत कागदपत्रे अभिलेखांमध्ये ठेवून ते जिल्हा उद्योग केंद्र / उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग यांच्या तपासणीसाठी उपलब्ध ठेवावेत. सामुहिक प्रोत्साहन योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करताना उद्योग घटकांनी उपरोक्त प्रपत्र (स्थालोरो-२ व स्थालोरो-१) हे देखिल पात्रतेचे निकष पूर्ण करण्यासाठी सादर करणे बंधनकारक आहे

(ब) सुक्ष्म, लघु, मध्यम, मोठ्या व विशाल औद्योगिक घटकांनी सामुहिक प्रोत्साहन योजनेचे लाभ घेतले नसतील अशा उपक्रमांनासुध्दा शासनाचे उपरोक्त धोरण लागू होईल. सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांनी संबंधित जिल्हा उद्योग केंद्र / उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग यांचेकडे आंत्रप्रिन्युअरर्स् मेमोरॅन्डम भाग-१ (Entrepreneurs Memorandum Part-I) दाखल करतांना नियत कालिक अहवाल विहीत प्रपत्रात (स्थालोरो-२) व आंत्रप्रिन्युअरर्स् मेमोरॅन्डम भाग-२ (Entrepreneurs Memorandum Part-II) सादर करतांना नियत कालिक अहवाल विहीत प्रपत्रात (स्थालोरो-१) सादर करणे आवश्यक राहील. आंत्रप्रिन्युअरर्स् मेमोरॅन्डम भाग-२ दाखल केल्यानंतर किंवा घटकात उत्पादन चालू झाल्यापासून प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता वर्ष संपल्यानंतर पुढील ३० जून पर्यंत नियत कालिक अहवाल विहीत प्रपत्रात (स्थालोरो-१) दाखल करणे बंधनकारक राहील.

(क) महाराष्ट्र राज्यात कमीत कमी १५ वर्षे वास्तव्य असलेली व्यक्ती ही स्थानिक व्यक्ती म्हणून समजली जाते. सदर व्यक्तीकडे सक्षम महसूल प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले अधिवास प्रमाणपत्र/ सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र/ शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा राज्यात कमीत कमी १५ वर्षे वास्तव्य असल्याचे सिध्द करणारी इतर प्रमाणपत्रे/ मिळकत कर भरल्याबाबतची कागदपत्रे असावीत.

(ड) ज्या औद्योगिक घटकांना वरील धोरणाचे पूर्णत: पालन करणे शक्य नसेल तर त्याबाबतची कारणे स्थालोरो-१ सह सादर करावीत व भविष्यात पर्यवेक्षकीय श्रेणीत किमान ५० % व पर्यवेक्षकीयसहीत इतर श्रेणीत किमान ८० % स्थानिक लोकांना नोकऱ्यांमध्ये घेण्याबाबतचे कालबध्द नियोजन सादर करावे.

२.	सदर धोरणाचा नियमीत आढावा घेण्यासाठी खालीलप्रमाणे जिल्हा स्तरावर समिती गठीत करण्यात येत आहे :-

(१) जिल्हाधिकारी - अध्यक्ष
(२) सहाय्यक कामगार आयुक्त - सदस्य
(३) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी - सदस्य
(४) सहाय्यक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र - सदस्य
(५) विभागीय अधिकारी,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ - सदस्य
(६) जिल्ह्यातील औद्योगिक संघटनांचे दोन प्रतिनिधी - सदस्य
(सदर प्रतिनिधींची निवड अध्यक्षांनी करावी . अशा सदस्यांची निवड प्रत्येकी एका वर्षासाठी राहील व ते पुनर्नेमणुकीस पात्र राहतील.)
(७) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र/ उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग - सदस्य सचिव

३.	जिल्हा समितीची बैठक ३ महिन्यातून किमान एकदा घेण्यात येईल. सदर समितीची बैठक शक्यतो जिल्हा उद्योग मित्र च्या बैठकीनंतर किंवा पूर्वी घेण्यात येईल. समितीचे कार्ये खालीलप्रमाणे राहतील :-

(१) पर्यवेक्षीय श्रेणीत किमान ५० % व पर्यवेक्षकीयसहीत इतर श्रेणीत किमान ८० % स्थानिक लोकांना नोकऱ्यांमध्ये घेण्याबाबतच्या स्थितीचा औद्योगिक घटक निहाय प्रपत्र स्थालोरो-१ व स्थालोरो-२ च्या आधारे आढावा घेणे.

(२) एखाद्या उद्योग घटकामध्ये स्थानिक लोकांना आवश्यक त्या प्रमाणात रोजगार देण्यामध्ये काही अडचणी असल्यास त्याबाबत चर्चा करुन अडचणींचे निराकरण करणे, ठराविक कौशल्याचे मनुष्यबळ आवश्यक असल्यास त्यानुसार व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विषयक संस्थांमध्ये प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणे किंवा इतर उपाययोजना सुचविणे.

(३) जिल्हा समितीच्या बैठकींचे कार्यवृत्त विकास आयुक्त (उद्योग) यांना सादर करण्यात येतील.

४.	राज्यपातळीवर स्थानिक लोकांना सदर धोरणानुसार रोजगार देण्याबाबत खालील प्रमाणे राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात येत असून त्या समितीमार्फत राज्यस्तरावरील समन्वय, अंमलबजावणी व संनियंत्रण करण्यात यावे :-

(१) विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, - अध्यक्ष
(२) कामगार आयुक्त, - सदस्य
(३) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण - सदस्य
(४) संचालक, तंत्र शिक्षण - सदस्य
(५) आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार - सदस्य
(६) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ - सदस्य
(७) सह/ उप सचिव (उद्योग विभाग) - सदस्य
(८) राज्यातील औद्योगिक संघटनांचे ६ प्रतिनिधी (सदर प्रतिनिधींची निवड अध्यक्षांनी करावी. अशा सदस्यांची निवड प्रत्येकी एका वर्षासाठी राहील व ते पुनर्नेमणुकीस पात्र राहतील.) - सदस्य
(९) उद्योग सह संचालक (स्थालोरो), उद्योग संचालनालय - सदस्य सचिव

५. राज्यस्तरावरील उपरोक्त समितीची बैठक वर्षातून किमान तीनदा घेण्यात येईल व समितीची कार्ये खालील प्रमाणे राहतील :-

(१) स्थानिक लोकांच्या रोजगाराबाबत शासनाच्या धोरणाच्या अंमलबजावणीबाबत आढावा घेणे.

(२) जिल्हा पातळीवरील समितीने केलेली कार्यवाही तसेच त्यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचनांबाबत चर्चा करुन त्याबद्दल निर्णय घेणे.

(३) जास्तीत जास्त स्थानिक लोकांना नोकऱ्यांमध्ये घेण्यासाठी उपाययोजना आखणे.

प्रत्येक बैठकीनंतर राज्यस्तरीय समिती याबाबतचा सविस्तर अहवाल प्रधान सचिव (उद्योग) यांचे मार्फत मा. मंत्री (उद्योग) यांना सादर करेल.

६. औद्योगिक घटकांकडून प्राप्त स्थालोरो बाबतच्या माहितीची (स्थालोरो-१ व स्थालोरो-२ प्रपत्र) संगणकीकरण तसेच सदर प्रपत्र इलेक्ट्रॉनिक पध्दतीने On line दाखल करण्याची व्यवस्था उद्योग संचालनालयाकडून करण्यात येईल.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००८११११७१२४१३३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(ग. गो. पंचभाई)
शासनाचे सह सचिव

प्रत :-

मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उप मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग.
विकास आयुक्त (उद्योग) उद्योग संचालनालय, मुंबई.
आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई.
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई
कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
उद्योग सह संचालक, विभागीय कार्यालय, ठाणे / नाशिक / औरंगाबाद / पुणे / नागपूर / अमरावती
उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई
सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्रे.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई. (२ प्रती)
निवड नस्ती. (उद्योग-६)

# स्थालोरो-१ (ELP-1)
## उद्योग संचालनालय
## महाराष्ट्र शासन, मुंबई
### *स्थानिक लोकांची नोकरभरती करण्याविषयीच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना
### **अस्तित्वात असलेल्या उद्योग उपक्रमांनी अंमलबजावणी करावयाचे

संकेतांक***

१. औद्योगिक घटकाचे नांव ..............................

२. पत्ता — कार्यालय — कारखाना

गांव/शहर

तहसील..................

..............................................................

जिल्हा ................................................ ..........

३. प्रमुख उत्पादने.................................................................

४. स्थापनेचे वर्ष............................

५. मालकी खालीलपैकी कोणत्या प्रकारातील:-

(१) केंद्र सरकार
(२) राज्य सरकार
(३) सहकारी संस्था
(४) सार्वजनिक मर्यादित
(५) खाजगी मर्यादित
(६) व्यक्तिगत मर्यादित
(७) भागीदारी
(८) इतर

६. माझ्या/आमच्या औद्योगिक घटकामध्ये नोकरभरती करण्याचा अधिकार......... असलेली व्यक्ती / प्रशासकीय आस्थापना अधिकारी ही मराठी स्थानिक व्यक्ती न जाणणारी स्थानिक/ स्थानिक नसणारी व्यक्ती आहे.

७. कारखाना अधिनियमाखाली नोंदणी झाली आहे काय ? होय/नाही

८. खालील प्रकारात नोंदणी झाली आहे का?

(अ) विशाल उद्योग घटक .. .. ..
(ब) मोठे उद्योग घटक .. .. ..
(क) मध्यम उद्योग घटक .. ..
(ड) लघु उद्योग घटक .. ..
(ई) सुक्ष्म उद्योग घटक ..

---

*स्थानिक व्यक्ती याचा अर्थ ज्यांचे वास्तव्य कमीत कमी १५ वर्षे महाराष्ट्रात आहे अशी व्यक्ती

**औद्योगिक उपक्रमाने ज्या व्यक्तीस सदरचे अधिकार प्रदान केले असतील अशा व्यक्तीनेच या प्रतिज्ञापत्रावर सही करावयाची आहे.

***आयताकृती जागेमध्ये संकेतांक देणेचे असून सदर जागा औद्योगिक उपक्रमांनी भरावयाच्या नाहीत.

१. माझ्या / आमच्या औद्योगिक उपक्रमामध्ये सध्या माहे २० अखेर सेवायोजनेचे स्वरुप:

| बाब | व्यवस्थापनाव्यतिरिक्त | | |
|---|---|---|---|
| | पर्यवेक्षकीय | इतर | एकूण |
| १. सध्याचे स्वरुप- | | | |
| (अ) एकूण नोकर | | | |
| (ब) त्यातील स्थानिक व्यक्तींची संख्या | | | |
| (क) एकूण बरोबर स्थानिक व्यक्तींची टक्केवारी | | | |
| २. सन २० मधील सेवायोजनस्थिती - | | | |
| (अ) एकूण नोकर | | | |
| (ब) त्यातील स्थानिक व्यक्तींची संख्या | | | |
| (क) एकूण बरोबर स्थानिक व्यक्तींची टक्केवारी | | | |

१०. मी / आम्ही असे लिहून देतो की, वरील बाबीस अनुसरुन औद्योगिक उपक्रमात नोकर भरती करताना सक्षम महसूल अधिकाऱ्यांनी उमेदवाराची नावे दिलेली अधिवास प्रमाणपत्र घेईन / घेऊ, किंवा मातृभाषा, शिक्षण अथवा प्रशिक्षण कोणत्या ठिकाणी झाले इत्यादी तपशिल पडताळून पाहून तो उमेदवार स्थानिक असल्याची खात्री त्याच्या नियुक्तीच्या वेळी करुन घेईन / घेऊ.

*११.(अ) पर्यवेक्षकीय सह व्यवस्थापनाव्यतिरिक्त प्रकारातील स्थानिक लोकांची टक्केवारी ८० टक्क्यांहून कमी नसावी व फक्त पर्यवेक्षकीय प्रकारातील स्थानिक लोकांचे प्रमाण ५० टक्क्यांहून कमी नसावे. याची मला/ आम्हाला जाणीव आहे. तथापि माझ्या / आमच्या घटकामध्ये खालील प्रकारामधील नोकरांची टक्केवारी विहित प्रमाणात नाही :-

(१) पर्यवेक्षकीय .. .. टक्के

(२) व्यवस्थापनाव्यतिरिक्त .. .. टक्के

(३) एकूण .. .. टक्के

(ब) सदरहू टक्केवारी विहित प्रमाणात नसल्याबाबतची सविस्तर कारणे खालीलप्रमाणे आहेत. (आवश्यक असल्यास वेगळ्या पानावर नमूद करावे.)

(क) विहित प्रमाणात स्थानिक लोकांना नोकऱ्यांमध्ये घेण्याबाबत कालबध्द कार्यक्रम खालीलप्रमाणे आणि त्याअंतर्गत घटकाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील खालीलप्रमाणे आहे. (आवश्यक असल्यास वेगळ्या पानावर नमूद करावे.)

(ड) सदरहू टक्केवारी विहित प्रमाणात पूर्ण करण्याकरीता राज्य शासनाकडून अपेक्षित सहाय्याची किंवा कार्यवाही नमूद करावी.

*१२. मी / आम्ही असे लिहून देतो की, सध्याच्या आस्थापना अधिकारी / नोकरभरती करणारे अधिकारी यांच्या जागी मराठी स्थानिक व्यक्तीची नेमणूक करण्यांत येईल.

संचालक / व्यवस्थापकीय संचालक/
प्रमुख व्यवस्थापक यांची स्वाक्षरी

ठिकाण :
दिनांक :

*११ पर्यवेक्षकीय व इतर श्रेणीत स्थानिक लोकांची टक्केवारी अनुक्रमे ५० व ८० टक्क्यांपेक्षा कमी असेल तरच लागू राहील.

*१२ सध्याचे अधिकारी मराठी जाणणारे स्थानिक व्यक्ती असतील तर हे लागू नाही.

# स्था लो रो -२ (ELP-2)

सेवायोजनमध्ये स्थानिक लोकांना घेण्याबाबतच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना.
(नवीन औद्योगिक उपक्रमांनी भरावयाचा )

औद्योगिक उपक्रमाचे नांव :
मुख्य प्रवर्तकाचे नांव :
पत्ता : कार्यालय: ____________________
____________________
____________________
____________________

कारखान्याच्या नियोजित जागेचा पत्ता: ____________________

१. मी / आम्ही असे वचन देत आहोत की माझ्या / आमच्या नवीन औद्योगिक उपक्रमांमध्ये पर्यवेक्षकीयसह व्यवस्थापनेतर नोकरीपैकी किमान ८० टक्के स्थानिक लोकांची भरती करण्यात येईल व केवळ पर्यवेक्षकीय नोकरांमध्ये किमान ५० टक्के स्थानिक लोक घेण्यात येतील.

२. मी / आम्ही असे वचन देतो की आमच्या नियोजित औद्योगिक उपक्रमामध्ये प्रशासकीय आस्थापना अधिकारी / नोकरभरती करण्यासाठी नेमलेले अधिकारी हे केवळ मराठी स्थानिक व्यक्तीच असतील.

३. मी / आम्ही असे लिहून देतो की, वरील बाबीस अनुसरुन औद्योगिक उपक्रमात नोकर भरती करताना सक्षम महसूल अधिकाऱ्यांनी उमेदवाराची नावे दिलेली अधिवास प्रमाणपत्र घेईन / घेऊ, किंवा मातृभाषा, शिक्षण अथवा प्रशिक्षण कोणत्या ठिकाणी झाले इत्यादी तपशिल पडताळून पाहून तो उमेदवार स्थानिक असल्याची खात्री त्याच्या नियुक्तीच्या वेळी करुन घेईन / घेऊ.

ठिकाण :

दिनांक :

संचालक / व्यवस्थापकीय संचालक /
प्रमुख व्यवस्थापक / मालक यांची स्वाक्षरी.

---

*स्थानिक व्यक्ती याचा अर्थ ज्याचे किमान १५ वर्षे महाराष्ट्र राज्यात वास्तव्य आहे अशी व्यक्ती.
**नवीन औद्योगिक उपक्रमाने ज्यांना स्वाक्षरी करण्याचे अधिकार प्रदान केले असतील त्यांनीच या प्रतिज्ञापत्रावर सही करणेची आहे.